**Time : 1½ Hours** **<u>FIRST-TERM</u>** **MARATHI LANG. II**

**Subject Code**

| H | 4 | 4 | 2 | 3 |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 40** **(Printed Pages : 12)** **Maximum Marks : 40**

**सूचना :** (*i*) प्रश्नपत्रिकेचे एकूण **चार** विभाग आहेत.

(*ii*) प्रत्येक प्रश्नाखाली A, B, C आणि D असे चार पर्याय दिलेले आहेत.

(*iii*) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका (OMR Sheet) दिलेली आहे. प्रत्येक प्रश्न–क्रमांकासमोर चार पर्यायासाठी क्रमाप्रमाणे वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले एकच वर्तुळ बॉलपेनने रंगवा.

(*iv*) एकदा बॉलपेनने वर्तुळ रंगवून नोंदवलेली उत्तरे बदलता येणे अशक्य आहे. त्यामुळे वर्तुळे रंगविताना योग्य ती काळजी घ्यावी.

(*v*) अचूक उत्तराचे वर्तुळ रंगवलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी एक गुण मिळेल. उत्तर चुकल्यास शुन्य गुण मात्र नकारात्मक (Negative) मूल्यांकन केले जाणार नाही.

(*vi*) उत्तरे नोंदविण्यासाठी एकच उत्तरपत्रिका दिली जाईल.

(*vii*) उत्तरे नोंदविण्यासाठी काळ्या अथवा निळ्या बॉलपेनचा वापर करावा.

## विभाग I : गद्य

1. 'मोत्याचे पीक' या पाठातील कारभारणीने आपल्या घरात असलेली एकच भाकरी कोणासाठी राखून ठेवली होती ? 1

(A) आपल्या पोरांसाठी

(B) आपल्या नवऱ्यासाठी

(C) पाणबुड्यांसाठी

(D) संन्याशासाठी

2. “तू घरात लक्ष घालू नकोस. शिकण्याकडे लक्ष दे.” हे वाक्य कोणी कोणास म्हटले आहे ? 1

(A) भावे सरांनी माशेलकरांना म्हटले

(B) एम्. एम्. शर्मा यांनी माशेलकरांना म्हटले

(C) आईने माशेलकरांना म्हटले

(D) डॉ. नायुडम्मांनी माशेलकरांना म्हटले

3. पतितोद्धारक यत्नदेवाची भक्ती करायची म्हणजे .......................... 1

(A) जगात व्यर्थ येरझाऱ्या घालीत बसायचे

(B) बाजारबुडग्यात सामील व्हायचे

(C) खुर्द्यात मोजले जायचे

(D) सदोदित बेहद्द कष्ट करायचे

4. काझिरंगा अभयारण्यात प्रथमच दिसलेल्या गेंड्याची तुलना लेखकाने कुणाशी केली आहे ? 1

(A) अंगपिंडान बलदंड असलेला माणूस

(B) घामावर लाल माती चिकटलेला मल्ल

(C) सौंदर्यदृष्टी असलेला जंगल अधिकारी

(D) हरणीसारखा मवाळ प्राणी

5. खालीलपैकी कोणते लेखक भारतातील अग्रगण्य वैज्ञानिक मानले जातात ? 1

(A) म. म. द. वा. पोतदार

(B) वि. स. खांडेकर

(C) व्यंकटेश माडगूळकर

(D) डॉ. रघुनाथ माशेलकर

6. ‘मांजर व्हा’ या पाठाचा साहित्यप्रकार कोणता ? 1

(A) फँटसी कथा

(B) नाट्यछटा

(C) आत्मकथन

(D) प्रवासवर्णन

7. ‘‘तर त्यावेळी शंभर रुपये द्यावे लागतील’’ हे वाक्य कोणी कोणास म्हटले आहे ? 1

(A) लेखकाने आपल्या बायकोला म्हटले

(B) लेखकाने जादूगाराला म्हटले

(C) जादूगाराने लेखकाला म्हटले

(D) भाटी मांजरीणीने लेखकाला म्हटले

8. लेखक मधु मंगेश कर्णिक यांना बालपणी मंगेश देवापेक्षा गांधीजींची तसबीर आवडायची कारण ............................ 1

(A) गांधीजींनी ब्रिटिशांना ‘चले जाव’ म्हटले होते

(B) गांधीजींचे लहान मुलासारखे निर्मळ हास्य

(C) गांधीजी सोमवारी मौन पाळायचे

(D) गांधीजी शेळीचे दूध व खजूर यावर निर्वाह करायचे

## विभाग II : पद्य

9. वत्स न देखता ......................... हुंबरती 1

(A) माई

(B) आई

(C) गाई

(D) बाई

10. रविशशि अग्नि नेणती ज्या रूपा। 1

स्वप्रकाशरूपा नेणे ........................ ॥

(A) चंद्र

(B) सूर्य

(C) वेद

(D) तेज

11. कसे पुण्य दुदैवी अन् पाप ........................ 1

(A) शक्तिशाली

(B) भाग्यशाली

(C) वैभवशाली

(D) बलशाली

12. गडगडावं गारांसारखं घरांवर

उन्हातली ........................ सावली व्हावं. 1

(A) तान्हीशी

(B) इवलीशी

(C) छोटीशी

(D) लहानशी

13. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' अशी भूमिका घेऊन वारकरी पंथाचा प्रचार करणारे संतकवी कोण ? 1

(A) संत सोहिरोबानाथ आंबिये

(B) संत तुकाराम

(C) संत एकनाथ

(D) संत नामदेव

14. ‘रणावीण स्वांतत्र्य कोणा मिळाले’ हा मंत्र देऊन अंदमानात काळ्या पाण्याची शिक्षा भोगलेले कवी कोण ? 1

(A) सुरेश भट

(B) वि. दा. सावरकर

(C) बा. भ. बोरकर

(D) नरेंद्र बोडके

15. सागराने भारतमातेला कोणते वचन दिले ? 1

(A) सावरकरांना आपल्या पाठीवरून परदेशात घेऊन जाणार व त्वरीत परत घेऊन येणार

(B) सावरकरांचे नाव अगस्ती ऋषिंना सागणार

(C) सावरकरांची त्यांच्या मित्रांशी भेट घटवून आणणार

(D) सावरकरांना वनवासाला पाठवणार

16. कवी बा. भ. बोरकरांच्या मते सुंदर हातांसाठी जुळणारी खालीलपैकी कोणती काव्यपंक्ती बरोबर आहे ? 1

(A) ओविती मुक्ताफळे

(B) ध्यासपंथे चालती

(C) तृप्तिची तिर्थोदके

(D) निर्मितीचे डोहळे

## विभाग III : व्याकरण

17. ‘‘मांजर काय नि माकड काय दोन्हींचे दर एकच आहेत’’ या वाक्यातील ‘मांजर’ या शब्दाची जात कोणती ? 1

(A) नाम

(B) सर्वनाम

(C) विशेषण

(D) क्रियापद

18. ‘ते झपाझप चालतात म्हणे’ या वाक्यातील सर्वनाम कोणते ? 1

(A) ते

(B) झपाझप

(C) चालतात

(D) म्हणे

19. ‘अतिशय गरिबीचे आणि हलाखीचे दिवस होते ते’’ या वाक्यातील उभयान्वयी अव्यय कोणते ? 1

(A) होते

(B) दिवस

(C) गरिबीचे

(D) आणि

20. ‘इश्श्य! बावळट आहे नुसता’ या वाक्यातील ‘इश्श्य’ या शब्दाची जात कोणती ? 1

(A) क्रियाविशेषण अव्यय

(B) शब्दयोगी अव्यय

(C) उभयान्वयी अव्यय

(D) केवलप्रयोगी अव्यय

21. खालील शब्दातून भाववाचक नाम शोधा. 1

(A) निर्मळपणा

(B) रंगतदार

(C) मायाळू

(D) हर्ष

22. खालीलपैकी कोणता शब्द भाववाचक नाम नाही हे ओळखा ? 1

(A) नम्रता

(B) मऊ

(C) गोडवा

(D) स्वातंत्र्य

23. ''गरिबी धट्टीकट्टी असते असे म्हणतात'' या वाक्यातील भाववाचक नाम कोणते ? 1

(A) गरिबी

(B) धट्टीकट्टी

(C) असते

(D) म्हणतात

24. ''गेंडा हे तसे वेडं जनावर आहे'' या वाक्यातील विशेषण ओळखा. 1

(A) गेंडा

(B) हे

(C) वेडं

(D) जनावर

25. खालीलपैकी कोणता शब्द विशेषण आहे ? 1

(A) भीषणता

(B) गुलामगिरी

(C) शहाणपणा

(D) खमंग

26. खालीलपैकी कोणता शब्द विशेषण **नाही** ? 1

(A) रानटी

(B) कोमलता

(C) कष्टाळू

(D) भारतीय

27. खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दाची जोडी कोणती ? 1

(A) देखणा × सुंदर

(B) मान × अपमान

(C) मरण × मृत्यू

(D) प्रकाश × उजेड

28. 'सामान्य' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ? 1

(A) अतिसामान्य

(B) मान्य

(C) अमान्य

(D) असामान्य

29. खालील विरुद्धार्थी शब्दांची कोणती जोडी **चूक** आहे ? 1

(A) शक्य × अशक्य

(B) स्वावलंबी × परावलंबी

(C) दगड × देव

(D) जीवन × मरण

30. खालीलपैकी कोणता शब्द विरुद्धार्थी शब्दाची जोडी आहे ? 1

(A) कृतकार्य

(B) जातिभेद

(C) विद्यार्थीदिशा

(D) रात्रंदिवस

## विभाग IV : लेखन

31. 'आरडाओरडा करणे' या अर्थाचा वाक्प्रचार कोणता ? 1

(A) पोट धरून हसणे

(B) हलकल्लोळ माजणे

(C) आयत्या पीठावर रेघोट्या ओढणे

(D) घायकुतीला येणे

32. खालीलपैकी कोणता वाक्प्रचार **नाही** ? 1

(A) रंगात येणे

(B) निर्वाह करणे

(C) भांबावून जाणे

(D) चित्र काढणे

33. 'नाकाने कांदे सोलणे' म्हणजेच ........................ 1

(A) कार्य साधणे

(B) प्रभाव टाकणे

(C) काळजी नसणे

(D) शिष्टपणा दाखविणे

34. ''काय अगदी अक्षरश: साहेबाच्या ताटाखालचं मांजर झालात की हो' या वाक्यात 'ताटाखालचं मांजर होणे' म्हणजेच ............ 1

(A) संतुष्ट करणे

(B) हेटाळणी करणे

(C) लाचार होणे

(D) ऐकण्यासाठी सावध होणे

35. 'पोटात शिरणे' म्हणजे काय ? 1

(A) खूप भूक लागणे

(B) वश करून घेणे

(C) गोंधळून जाणे

(D) मिळून मिसळून राहणे

36-40. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा :

गोमंतभूमीत जन्म घेतलेले आणि आपल्या व्यक्तिमत्वाची तेजस्वी मुद्रा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात उमटविलेले प्रकांड पंडित आणि बौद्ध धर्माचे उपासक आचार्य धर्मानंद कोसंबी यांनी अखंड आयुष्यात ज्ञानमार्ग पत्करला. राष्ट्रीय स्वातंत्र्यसंग्रामातही त्यांनी स्वत:ला झोकून दिले. महात्मा गांधीच्या असहकारितेच्या आंदोलनात ते सहभागी झाले. या कृतिशील प्रज्ञावंताने लिहिलेले 'निवेदन' हे आत्मचरित्र 1924 मध्ये प्रसिद्ध झाले. मराठीतील लक्षणीय स्वरूपाच्या आत्मचरित्रांमध्ये 'निवेदन' या पुस्तकाचा आवर्जून उल्लेख केला जातो. त्याला अनेक कारणे आहेत. धर्मानंदांच्या जडणघडणीचा आलेख या आत्मचरित्रात आहे. ज्ञानप्राप्तीसाठी त्यांना खडतर साधना करावी लागली. देशात आणि परदेशांत त्यांनी भ्रमंती केली. अनेक आपत्तीना तोंड देत त्यांनी ध्येयप्राप्ती केली. मानवाच्या उन्नतीचा ध्यास घेऊन बौद्ध धर्माची स्थापना गौतमबुद्धाने केली होती. विशुद्ध नैतिकतेच्या पायावर आधारलेला हा धर्म. त्यातील नीतितत्वांचा सम्प्रगतेने धर्मानंदांनी अभ्यास केला. ती प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांची ही जीवननिष्ठा आणि अंगीकारलेली विचारधारा नंतरच्या पिढ्यांसाठी पथदर्शक ठरली.

— गोमंतक: प्रज्ञा आणि प्रतिभा

डॉ. सोमनाथ कोमरपंत

36. धर्मानंद कोसंबी यांच्या आत्मचरित्राचे नाव काय ? 1

(A) गौतमबुद्ध

(B) निवेदन

(C) जीवननिष्ठा

(D) ज्ञानमार्ग

37. धर्मानंद कोसंबी कोणत्या धर्माचे उपासक होते ? 1

(A) जैन

(B) बौद्ध

(C) लिंगायत

(D) महानुभाव

38. 'आपत्ती' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ? 1

(A) प्रयत्न

(B) धर्म

(C) संकट

(D) उन्नती

39. लेखकाच्या मते धर्मानंद कोसंबींच्या कोणत्या गोष्टी भावी पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल ? 1

(A) त्यांचे असहकारितेचे आंदोलन

(B) त्यांचे देशात परदेशात भम्रंती करणे

(C) त्यांची जीवननिष्ठा व अंगीकारलेली विचारधारा

(D) त्यांची बौद्ध धर्माची उपासना

40. वरील उताऱ्यासाठी कोणते शीर्षक समर्पक ठरेल ? 1

(A) आचार्य धर्मानंद कोसंबी

(B) भारताचा स्वातंत्र्य संग्राम

(C) महात्मा गांधी

(D) गोमंतभूमी